**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.**

Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in

फोन नं. ०२०/२६०५१७२९, २६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६११११५३

क्र. विधी-२०१९/प्र.क्र. १६६ /सीईटीसेल/ 15217 दिनांक : 25 NOV 2019

**परिपत्रक :-**

**विषय : उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांचे शैक्षणिक कागदपत्रे तपासणीकरिता अभ्यासक्रमनिहाय सुविधा केंद्राची निर्मिती करणेबाबत . . .**

संदर्भ : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई चे पत्र क्र. उशिप्र-१११९/प्र.क्र.१०५/ सीईटी/ प्रवेश सुविधा केंद्र/२८६१, दिनांक १६.११.२०१९

उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील विधी ३ वर्षे, विधी ५ वर्षे, बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., बी.ए./बी.एस्सी.बी.एड., बी.एड.-एम.एड., अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया ही मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे एक खिडकी पध्दतीने होत आहे.

२. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील उक्त अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कागदपत्र पडताळणीचे e-verification करण्यात आले आहे. तथापि, विधी अभ्यासक्रमाचे e-verification मध्ये त्रुटी आढळून आल्या असल्याच्या तक्रारी संचालनालय तसेच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडे प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये संचालनालयाच्या अखत्यारीतील व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशापूर्वी कागदपत्रे पडताळणी करणे, अर्ज स्विकृती करणेसाठी अर्ज स्विकृती केंद्र Facilitation Centre (FC) आणि प्रवेश निश्चिती केंद्र Admission Reporting Centre (ARC) निश्चित करावयाचे आहे.

३. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे कामकाज करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या महाविद्यालयांनी, महाविद्यालयाचे नाव, उपलब्ध संगणक, स्कॅनर, इंटरनेट सुविधेबाबतची माहिती संचालनालयास law.dhepune@nic.in या ईमेलवर सादर करावी.

हरिभाऊ शिंदे

**( हरिभाऊ शिंदे )**
वरिष्ठ प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

(कृ.मा.प.)

प्रति,

१. प्राचार्य, सर्व विधी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
२. प्राचार्य, सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
३. प्राचार्य, सर्व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
२. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेलसिएर इमारत, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई, ४०० ००१.
३. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ९ वा मजला, न्यु एक्सेलसिएर इमारत, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई, ४०० ००१.